# MEMORANDUM OF UNDERSTANDING

*between*

**ANEKANT EDUCATION SOCIETY'S**

**ANEKANT INSTITUTE OF MANAGEMENT STUDIES (AIMS), BARAMATI**

*and*

**NEXTGEN EDUCATION FOUNDATION, PUNE**

*on*

**"COOPERATION FOR ENHANCEMENT OF SKILLS BASED TRAINING, EDUCATION AND RESEARCH, PROJECTS, AND CONSULTANCIES"**

**Date: 04/12/2020** **Day: Friday**



croma A TATA Enterprise
Shop from the comfort of your home and get next day delivery

## बारामतीच्या एम्समध्ये सॅप प्रणाली शिकवली जाणार

**बारामती, ता. ६ :** येथील अनेकान्त एज्युकेशन सोसायटीच्या अनेकान्त इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट स्टडीज् (एम्स) व नेक्स्टजन एज्युकेशन फाउंडेशन यांच्यात नुकताच सामंजस्य करार झाला. या माध्यमातून बारामती पंचक्रोशीतील विद्यार्थ्यांना सॅप (SAP) तंत्रज्ञानाची परिपूर्ण माहिती व प्रमाणित कोर्स करण्याची संधी दिली जाणार आहे.

आजच्या तंत्रज्ञानाच्या युगात अशा कंपन्यांमध्ये नोकरी मिळविण्यासाठी विद्यार्थ्यांना शैक्षणिक पात्रतेबरोबरच सॅप तंत्रज्ञान अवगत असणे क्रमप्राप्त झाले आहे. हीच गरज ओळखून अनेकान्त इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट स्टडीज, बारामती या संस्थेने हा सामंजस्य करार केलेला आहे. यावेळी अनेकान्त एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष अरहतदास शहा (सराफ) आणि सचिव जवाहर वाघोलीकर यांनी या सर्वांचे अभिनंदन केले. संस्थेचे सचिव मिलिंद वाघोलीकर व संचालक डॉ. एम. ए. लाहोरी यांनी विद्यार्थ्यांना सॅप तंत्रज्ञान आणि भविष्यातील संधी याबाबत मार्गदर्शन केले. यावेळी नेक्स्टजनचे सल्लागार चिन्मय नानोटी यांनी औद्योगिक क्षेत्रामध्ये सॅप तंत्रज्ञानाचा वापर आणि येणाऱ्या काळात त्याची संभाव्य व्याप्ती याबाबत मार्गदर्शन केले.

Pune, District-Today
07/12/2020 Page No. 3

# MEMORANDUM OF UNDERSTANDING

*between*

**ANEKANT EDUCATION SOCIETY'S**

**ANEKANT INSTITUTE OF MANAGEMENT STUDIES (AIMS), BARAMATI**

*and*

**NEXTGEN EDUCATION FOUNDATION, PUNE**

*on*

**"COOPERATION FOR ENHANCEMENT OF SKILLS BASED TRAINING, EDUCATION AND RESEARCH, PROJECTS, AND CONSULTANCIES"**

**Date: 04/12/2020** **Day: Friday**

**News Paper- Divya Marathi Date: 09/12/2020**



market watch

## AIMS मध्ये SAP शिकण्याची सुवर्ण संधी

सोलापूर - अनेकान्त एज्युकेशन सोसायटीच्या अनेकान्त इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट स्टडीज, बारामती व नेक्स्टजन एज्युकेशन फौंडेशन, पुणे यांच्यामध्ये सामंजस्य करार झाला. या सामंजस्य कराराच्या माध्यमातुन विद्यार्थ्यांना SAP तंत्रज्ञानाची इत्थंभूत माहिती दिली जाणार आहे. गेल्या अनेक दशकांपासून SAP तंत्रज्ञानाचा वापर औद्योगीक क्षेत्रामध्ये मोठ्या प्रमाणात केला जातो. यामध्ये प्रामुख्याने ऑटोमोबाईल, सॉफ्टवेअर, फूड, फार्मा आणि केमिकल इ. चा समावेश होतो. अनेकान्त इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट स्टडीज, बारामती या संस्थेने हा सामंजस्य करार केलेला आहे जेथे विद्यार्थ्यांना व्यवस्थापनाच्या शिक्षणाबरोबरच SAP तंत्रज्ञान नाममात्र शुल्क देऊन शिकता येईल. यावेळी अरहतदास शहा आणि जवाहर शहा यांनी या नाविन्यपूर्ण उपक्रमाबद्दल सर्वांचे अभिनंदन केले. तसेच अनेकान्त इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट स्टडीज, बारामतीचे मिलिंद शहा व डॉ. एम. ए. लाहोरी यांनी विद्यार्थ्यांना SAP तंत्रज्ञान आणि भविष्यातील संधी याबाबत मार्गदर्शन केले. यावेळी सर्व प्राध्यापक आणि विद्यार्थी प्रतिनिधी उपस्थित होते. समन्वयक डॉ. प्रविण यादव यांनी आभार मानले.